महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN NO.U40109MH2005SGC153646)


**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**अतिउच्च दाब(संवसु) विभाग,सोलापूर (महापारेषण)**

प्रशासकीय इमारत २२० के.व्ही. बाळे उपकेंद्र आवार, बार्शी रोड, अंबिकानगर, बाळे, सोलापूर.४१३२५५. (महाराष्ट्र)

Email Address: ee6210@mahatransco.in


जा.क्र:- काअ/अऊदा/(संवसु)/ वि/सोला./मासं/ 0797 दिनांक:- 10 JUN 2024

## जाहीर सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, सोलापूर अंतर्गत वर्ष २०२४-२५ करिता आय.टी.आय. (वीजतंत्री) शिकाऊ उमेदवारांची १ वर्ष कालावधीसाठी भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. याकरिता खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून पात्र उमेदवारांनी **दि.११.०६.२०२४ ते २१.०६.२०२४ पर्यंत रात्री २३:५९** वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर खाली नमूद आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज करावे.

| कार्यालयाचे नांव | आस्थापनेचा नोंदणी (Registration) क्र. | ट्रेड | एकूण जागा |
|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता,<br>अउदा संवसु विभाग, सोलापूर.<br>म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित सोलापूर. | **E09162700771** | वीजतंत्री<br>**( Electrician )** | ६३ |

१. **शैक्षणिक अर्हता:-**

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे

२.राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. **शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे** (लागू असल्याप्रमाणे):-

१.एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र.

२. आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका (चार सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रिकाची प्रत).

३.शाळा सोडल्याचा दाखला.

४.आधार कार्ड ( आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नांव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नांवाशी सुसंगत असावे तसेच आधारकार्ड आपल्या प्रोफाईल (Profile) शी लिंक असणे आवश्यक आहे.)

५.मागास वर्गात समाविष्ठ असल्यास जात प्रमाणपत्र.

६.महाराष्ट्र राज्याचे रहिवासी (Domicile) प्रमाणपत्र.

७.प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र-नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अजा व अज प्रवर्गातील उमेदवार वगळून).

८.आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे प्रमाणपत्र

९. सामाजिक आणि शैक्षणीक मागास वर्गात समाविष्ठ असल्यास (SEBC) प्रमाणपत्र व इतर सर्व आवश्यक कागदपत्रांची मुळ प्रत उमेदवा-यांने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करून आपलोड करावे.

३. **विद्यावेतन:**- विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.

४. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधंनकारक राहणार नाही.

५. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास, वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल / अपात्र ठरविण्यात येईल.

६. अर्ज करण्यापुर्वी उमेदवारांनी १०० % **Profile Update** असल्याची खात्री करावी.

७. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक / प्रमाणपत्र (चार ही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे. या बाबत अंतिम तारखेनंतर कोणतीही तक्रार ऐंकून घेतली जाणार नाही.

८. **शिकाऊ उमेदवारानी ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना पोर्टलवर फोटो, मुळप्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळप्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा**

**अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी तसेच अपूर्ण, चूकीचे व अपुऱ्या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

९. शिकाऊ उमेदवारांची सही, पालकांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. मार्क, आयटीआय मार्क , ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

१०.शिकाऊ उमेदवारांची निवड ही, एसएससी व आयटीआय परीक्षेचे मिळून एकूण प्राप्त गुणांच्या ५० टक्के सरासरीच्या आधारे गुणवत्ते यादीनुसार होईल. मौखीक चाचणी घेतली जाणार नाही किंवा इतर कोणतेही गुण ग्राह्य धरण्यात येणार नाही तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहून खालील प्रमाणे प्रवर्गनिहाय केली जाईल.

| अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ. ३% | भ.ज.ब. २.५% | भ.ज.क. ३.५% | भ.ज.ड. २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | आर्थिक दृष्टया दुर्बल (EWS) १०% | सामाजिक आणि शैक्षणीक मागासवर्ग (SEBC) १०% | अराखीव २८% | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | २ | २ | २ | १ | १ | १२ | ६ | ६ | १८ | ६३ |

(दिव्यांग उमेदवारांसाठी ४ % अरक्षण राहील.)

११.SEBC व EWS या प्रवर्गात उमेदवार न मिळाल्यास सदर जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यात येईल.

१२.आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१३.वयोमर्यादा १८ ते ३८ वय वर्षे (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिलक्षम).

१४.ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवारानं सद्यस्थितीत कार्यान्वित असणारा E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वियत नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील.

१५.शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१६.ऑनलाईन अर्ज प्राप्त उमेदवारांना दस्तऐवज / शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी करीता ई-मेलद्वारे दिनांक, वेळ व स्थळ कळविण्यात येईल.

**१७.प्रणालीमध्ये बदल झाल्यामुळे या आदी ज्या उमेदवारांनी वरील किंवा याच अस्थापनेच्या इतर अस्थापन नोंदणी कमांकावर ऑनलाईन अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सदर भरती प्रक्रिये करता फक्त दि.११.०६.२०२४ ते २१.०६.२०२४ पर्यंत केलेल्या अर्जाचां विचार केला जाईल वर नमूद दिनांकाच्या पुर्वी किंवा नंतर ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवरांचा भरती / निवड प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणतीही तकार ऐंकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

१८.सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे वेळोवेळी प्रसारीत केलेले संबंधित परिपत्रके , नियम, अटी व शर्ती लागू राहतील.

१९.ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीरातीसह जोडलेला **प्रपत्र-अ** परीपूर्ण भरुन त्यासह ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत व मुद्दा क्र.०२ मध्ये नमुद आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत / स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती (प्रत्येकी १ प्रत) व इतर कागदपत्रे **दिनांक २८.०६.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत** खालील पत्त्यावर स्वहस्ते / पोस्टाने पोहचेल या बेताने पाठवावे. तसेच सदर **प्रपत्र-अ** आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रांसह विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास आपला अर्ज भरती / निवड प्रक्रियेसाठी विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**कार्यालयीन पत्ता:-**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अउदा संवसु विभाग, सोलापूर, प्रशासकीय इमारत**
**२२० के.व्ही. बाळे उपकेंद्र आवार, अंबिकानगर,**
**बार्शीरोड बाळे, सोलापूर.४१३२५५.(महाराष्ट्र)**

**सहपत्र:प्रपत्र-अ**

कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग,सोलापूर.

## प्रपत्र-अ

**म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित अंतर्गत कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, सोलापूर या कार्यालयाच्या जाहिरातीसनुसार करावयाचा अर्ज.**

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडे काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी (स्टेपल किंवा पीन लावू नये) |

**Apprentice Registration Number:-**
**(Starting With 'A')**

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवारांचे पुर्ण नांव | (आडनाव) (उमेदवारांचे नांव) (वडीलांचे/पतीचे नांव) |
| २ | लिंग व वैवाहिक स्थिती | (स्त्री) (पुरुष) (विवाहीत) (अविवाहीत) |
| ३ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता | ------------------------------------------------<br>------------------------------------------------<br>----------------------------------पिन कोड:- |
| ४ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | ------------------------------------------------<br>------------------------------------------------<br>----------------------------------पिन कोड:- |
| ५ | दूरध्वनी / मोबाईल क. | १.<br>२. |
| ६ | ई-मेल आयडी | |
| ७ | आधारकार्ड नंबर | |
| ८ | बॅक तपशील | बॅकाचे नांव.<br>बॅक अकाउंट नं.<br>ब्रांच नांव.<br>आयएफसी नं.<br>एमआयसीआर कोड. |
| ९ | जन्म दिनांक दिनांक/महिना/वर्षे | |
| १० | जातीचा प्रवर्ग | |
| ११ | उमेदवार अपंग आहे का ? | होय / नाही |

जातीचा प्रवर्ग:

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | ईमाव | सा.व.शै. मा.व | ईडब्ल्यू एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | SEBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | |

(लागू असलेल्या ठिकाणी ✓ अशी खुण करा)

१२.शैक्षणिक पात्रता (प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात)

| अ. क्र. | परिक्षेचे नाव | शाळा / मंडळ/विद्यापीठ/संस्थेचे नाव | परिक्षा उत्तीर्ण वर्ष | परिक्षेतील एकुण गुण | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एस.एस.सी. | | | | | |
| २. | आय.टी.आय. (विजतंत्री) | | | | | |

१३.जोडावयाची आवश्यक प्रमाणपत्रे (लागू असलेल्या ठिकाणी ✓ अशी खुण करावी)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रपत्र-अ व स्वघोषणापत्र | होय | नाही |
| २ | या आस्थापणेकडे केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रत | होय | नाही |
| ३ | एस.एस.सी.गुणपत्रिका | होय | नाही |
| ४ | आय.टी.आय.गुणपत्रिका(चारही सेमिस्टर) | होय | नाही |
| ५ | शाळा सोडल्याचा दाखला | होय | नाही |
| ६ | आधार कार्ड | होय | नाही |
| ७ | सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र | होय | नाही |
| ८ | प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non creamy layer) (अनु.जाती / अनु.जमाती वगळून) | होय | नाही |
| ९ | सक्षम अधिकारी यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile) | होय | नाही |
| १० | आर्थिकदृष्ठया दुर्बल घटक उमेदवारांकरीता शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांनी दिलेले (EWS) प्रमाणपत्र | होय | नाही |
| ११ | सामाजिक आणि शैक्षणीक मागास वर्गात समाविष्ठ असल्यास शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांनी दिलेले (SEBC) प्रमाणपत्र | होय | नाही |
| १२ | उमेदवार अपंग असल्यास सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र | होय | नाही |

## प्रतिज्ञापत्र

मी..........................................................................................................................

म.रा.वि.पा.कंपनी मर्यादित, अंतर्गत कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, सोलापूर या कार्यालयाची शिकाऊ उमेदवार भरतीबाबतची प्रसारीत केलेली जाहीरात काळजीपूर्वक वाचली असून जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. दिलेल्या अर्जात भरलेली संपूर्ण माहिती खरी व योग्य आहे. सदर माहिती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच माझी निवड झाल्यास मी अउदा संवसु विभाग, सोलापूर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कुठल्याही ठिकाणी रूजू होण्यास तयार आहे.

स्थळ :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी